**<u>नि. फौ. खटला क्र.११३/२०२२</u>**

**<u>निशाणी क्र.८२</u>**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०५ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : रणधीर प्रकाश कांबळे,

**वय** : ३२ वर्षे, **काम** : मजुरी,

**राहणार** : येणकी, ता. उदगीर, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस. कुलकर्णी यांचेमार्फत ::**

फिर्यादी दयानंद यास मी ओळखतो. मी आरोपींना ओळखतो. ते माझ्या गावातील आहेत. दि.२८/०५/२०२२ रोजी रात्री १०.०० वाजता दयानंद कांबळेच्या घरी भांडण सुरू होते. मी तेथे गेलो होतो. दयानंद कांबळे हा शेतातून आला, नांगरटी करताना शिवकुमार व माणिकप्रभू हे मारायला आले व खिशातून २० हजार रुपये काढून घेतले, असे सांगत होता. दयानंद हा अजय भंडे व बिरबल म्हेत्रे यांच्यासोबत त्यानंतर दवाखान्यात गेला होता. त्यानंतर मी घरी गेलो. मी त्यानंतर झोपलो होतो. त्यानंतर रात्री १२.०० ते १२.३० वाजताच्या दरम्यान गौतम कांबळेच्या घरासमोर पुन्हा भांडण सुरू झाले होते. तेथे १०–१५ लोक होते. शिवकुमार कांबळे, गुंडू शिंदे, नारायण शिंदे, विठ्ठल शिंदे, माणिप्रभू, वच्छलाबाई, रुक्मिनबाई, रेखाबाई, राजाबाई हे गौतमला तू घराच्या बाहेर निघ, मादरचोद, तुकडे करतो अशी शिवीगाळ करीत होते. त्यानंतर सर्व लोक शांत झाले. गुंडू, रुक्मीण, वच्छला, विठ्ठल व तुळशीराम हे आजरोजी गैरहजर आहेत. (अर्ज नि.८० वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.३, ५, ८, १० व १२ यांची गैरहजेरी माफ केलेली आहे.)

सरतपास पूर्ण.

**:: आरोपी क्र.२ ते ६ व ८ ते १३ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एन.एल. मध्वरे यांच्यामार्फत ::**

०२. जमीन सर्वे क्र.९६ ही कोठे आहे हे मला माहीत नाही. आरोपी आणि

दयानंद यांच्यामध्ये जमिनीचा वाद सुरू आहे. परंतु त्यांचा कोठे वाद सुरू आहे हे मला माहीत नाही. मी दयानंदच्या नावाचा ७/१२ उतारा बघितला नाही. मी आरोपींच्या नावाचा ७/१२ उतारा बघितलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, रात्री १०.०० वाजताची कथित घटना माझ्यासमक्ष घडलेली नाही. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. आता मला जबाबातील अधोरेखांकित भाग दि.२८/०५/२०२२ रोजी रात्री १०.०० वाजता मी घरीच असताना अचानक ओरडण्याचा आवाज आला, हे मी पोलिसांना सांगितले होते. ते जबाबामध्ये बरोबर लिहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी हजर नव्हतो व त्यामुळे तेथे नेमके काय घडले हे मला माहीत नाही.

०३. मी आणि दयानंद नातेवाईक आहे परंतु मित्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना शिक्षा होण्यासाठी आणि दयानंदला मदत होण्यासाठी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझा प्रकरणाशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन केल्याप्रमाणे घटना घडली नाही.

उलटतपास पूर्ण.

**:: आरोपी क्र.१, ९, १४ व १५ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. बिरादार यांच्यामार्फत ::**

०४. जळबा भुताळे व गोविंद भुताळे हे मयत आहेत. जळबा भुताळेच्या नावे सर्वे क्र.७९/३ मध्ये ० हे. ९२ आर जमीन असल्याचा ७/१२ उतारा मी बघितलेला नाही. जळबाच्या मृत्यूनंतर गोविंद, माणिकप्रभू व रंजना यांच्या नावे वारसांना फेरफार झाला याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सावित्राबाई आणि गोविंद हे पूर्वीपासून अपंग आहेत व त्यांना चालता फिरता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माणिकप्रभूला बेंबीचा त्रास असल्याने चालता फिरता येत नाही.

०५. आम्ही तीन भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गावामध्ये नेहमी

भांडण करतो. आरोपी गुंडूने माझ्याविरुध्द फौजदारी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीला मदत करण्यासाठी खोटी साक्ष दिली आणि मला घटनेबाबत माहिती नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

दि.२०/०४/२०२६.